# प्रतिज्ञापत्र

"कुंपनापलीकडले शेत" या कथासंग्रहाचा साहित्य आणि संस्कृती या दृष्टिकोणातून अभ्यास" या विषयावरील लिहलेला लघु शोधप्रवंध मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. पदवीसाठी सादर केलेला आहे. हा लघु शोधप्रवंध अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्य कोठेही अथवा कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक :

श्रीमती. वैशाली हणमंत शिणगारे-झरे

प्राचार्य डॉ. हरिश्चंद निर्मळे एम.ए, पीएच.डी.
मराठी विभाग
विलिंग्डन महाविद्यालय, सांगली
महाराष्ट्र

# प्रमाणपत्र

वैशाली हणमंत शिणगारे-झरे यांनी "कुंपनापलीकडले शेत" या कथासंग्रहाचा साहित्य आणि संस्कृती या दृष्टिकोणातून अभ्यास" या विषयावर माझ्या मार्गदर्शनाखाली हा लघु-शोध-प्रकल्प प्रबंधिकेच्यारूपाने स्वत:च पूर्ण केला आहे. ही प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे. त्यांचे हे शोध प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व ती सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते.

स्थळ :-

दिनांक :-

प्राचार्य. डॉ. हरिश्चंद्र निर्मळे
मार्गदर्शक

# ऋणनिर्देश

प्रस्तुत प्रबंधिकेसाठी मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे अनेकांचे साह्य लाभले. त्यामुळेच एम. फिल.चा अभ्यासक्रम मी व्यवस्थितपणे व समाधानकारकरीत्या पूर्ण करू शकले. या अभ्यासक्रमाचा एक भाग असलेली प्रबंधिका विद्यापीठास आज सादर करीत असताना त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे हे मी माझे कर्तव्य समजते.

सर्वप्रथम विलिंग्डन कॉलेजचे प्राचार्य डॉ. हरिश्चंद्र निर्मळे यांनी मला एम्. फिल्. करण्यास मार्गदर्शन करण्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे मला वेळोवेळी पाठिंबा दिला. अभ्यासात सर्वतोपरी मदत व मार्गदर्शन केले. त्यामुळे त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करणे हे मी माझे मनापासूनचे आदय कर्तव्य समजते. संशोधनासाठी जिद्द लागते, अभ्यास काटेकोरपणे व सातत्याने करावा लागतो, आणि प्रबंधिका वेळेत पूर्ण करावी लागते, असे त्यांनी सुरूवातीलाच सांगितले. विषयाच्या निवडीपासून ते प्रबंधिका लिहून पूर्ण होईपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत त्यांनी मला सतत दिशा दाखवली. आपल्या अनेक व्यापात कार्यमग्न असूनही माझ्या कामात बारकाईने लक्ष पुरवले, यासाठी माझे मार्गदर्शक – डॉ. हरिश्चंद्र निर्मळे यांच्याविषयी कृतज्ञता शब्दात व्यक्त करण्यापलीकडची आहे. त्यांनी दिलेली प्रेरणा व स्फूर्ती मला पुढील आयुष्यात निश्चितपणे उपयोगी पडेल.

मला शिकण्यासाठी सतत प्रवृत्त करणारे माझे स्नेही, माझे व्यवसायिक सहकारी यांनी मला सतत कार्यमग्न राहण्यास प्रोत्साहन दिले. मला संशोधनाच्या कामात प्रगती करण्याविषयी वेळोवेळी जागृत करणारे माझे अधिकारी श्री. दत्तात्रय लोंढे माझे व्यावसायिक सहकारी माझ्या प्रबंधिकेचे वाचन करणारे प्रा. वासमकर व मला योग्य मार्गदर्शन करणारे इतर प्राध्यापक तसेच माझे कुटुंबिय आई – सौ. सुमन, वडील – श्री. हणमंत आणि भावंडे, माझ्या सासरकडील मंडळी सासू–सासरे, पती– महादेव बाबूराव झरे यांनी आणि माझ्या कुटुंबातील सर्व व्यक्तींनी मला

साथ दिली. या सर्वांच्या पाठिंब्यामुळेच मी या प्रबंधिकेचे काम पूर्ण करू शकले, याची मला पूर्ण जाणीव आहे.

माझ्या प्रस्तुत अध्ययनासाठी आमच्या शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयाचा मला अतिशय उपयोग झाला. तसेच वायसिंगर लायब्ररी, मिरज या ग्रंथालयाचाही उपयोग झाला. या ग्रंथालयांच्या अधिकारी आणि सेवकवर्गाने दिलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. प्रस्तुत प्रबंधिकेचे स्वच्छ व शुद्ध टंकलेखन श्री. ओंकार रा. तोडकर (मिरज) यांनी केले आणि या प्रबंधिकेचे रूप देखणे झाले, त्यांचे मी आभार मानते.

श्रीमती. वैशाली हणमंत शिणगारे-झरे

# भूमिका

जिल्हा परिषद शाळेत मी जेव्हा एक प्राथमिक शिक्षिका म्हणून रूजू झाले. तेव्हा मी शिक्षणक्षेत्रात नव्याने काम करीत होते. विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल माझ्या वेळेची म्हणजे मी विद्यार्थीनी असतानाची परिस्थिती आता राहिली नाही. आताच्या विद्यार्थ्यांचे वागणे मला सारखे कुठेतरी सलत होते. त्यांच्या सर्व वर्तनातच बदल झाला होता. त्यामुळे मी अस्वस्थ होत.

अशा परिस्थितीतच दिलीप चित्र्यांचा "कुंपनापलीकडले शेत" हा कथासंग्रह माझ्या वाचनात आला. तेव्हाच माझ्या मार्गदर्शकांनी मला याच विषयावर तुम्ही प्रबंधिका सादर करावा, असे सुचवले. त्यांच्या मते हा एक वेगळयाच विषयावरील अभ्यास होईल. आतापर्यंत या विषयावर फारसे संशोधन झाले नाही. त्यामुळे या विषयावर लिहण्यास त्यांनी मला प्रवृत्त केले. आज आपल्याला समाजात जे पाश्चात्यांचे अनुकरण दिसून येते, त्या विषयाचा परामर्श या प्रबंधिकेत घेण्याचा प्रयत्न मी केला आहे.

दिलीप चित्र्यांच्या या कथासंग्रहात परदेशी लोकांच्या जीवनातील घटना-प्रसंग शब्दबद्ध केलेले आहेत. या कथांचे लेखक भारतीय आहेत, पण ते परदेशात स्थायिक झालेले आहेत. त्यांना आलेले अनुभव त्यांनी या कथांच्या रूपाने मांडले आहेत. असा हा एक वेगळाच कथासंग्रह आहे. त्याचा सांस्कृतिक दृष्टिकोणातून अभ्यास येथे केला आहे. एकूण पाच प्रकरणात त्याचे विवरण केले आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेत पहिल्या प्रकरणात साहित्य आणि संस्कृती परस्परावर कशा अवलंबून आहेत. याचा उहापोह करून मराठी कथेचा उगम व कथेची वाटचाल या गोष्टींचा परामर्श घेतला आहे. प्रस्तुत कथासंग्रहाची ठळक वैशिष्ट्ये, इतर कथासंग्रहापेक्षा त्यातील नाविन्यपूर्ण

गोष्टींचे विवरण दुसऱ्या प्रकरणात केले आहे. तिसऱ्या प्रकरणात भारतीय आणि पाश्चिमात्य देशातील लोकांच्या सांस्कृतिक संबंधांची चर्चा केली आहे. पाश्चात्य संस्कृतीचा भारतीय लेखकांवर होणाऱ्या परिणामांची चर्चा चौथ्या प्रकरणात केली असून, पाचव्या प्रकरणात भारतीय आणि पाश्चात्य संस्कृती यांचा तुलनात्मक अभ्यास केला आहे.

या सर्व प्रकरणांच्या आधारावर शेवटचे 'उपसंहार' हे प्रकरण लिहिले आहे. वरील सर्व प्रकरणांचे थोडक्यात सार उपसंहारात आले आहे.

प्रबंधिकेत सर्व प्रकरणात ज्यांचे अभिप्राय आणि अवतरणे आली आहेत, त्यांची अनुक्रमे नोंद संदर्भ टीपांत केली असून प्रबंधिकेस आधारभूत ठरलेल्या सर्व संदर्भ साहित्याची सूची अखेरीस जोडली आहे. प्रस्तुत कथासंग्रहातील कथालेखकांचा पूर्ण परिचय शेवटी दिला असून प्रबंधिकेस परिपूर्णता आणण्याचा मी कसोशीने व प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे.

# अनुक्रमणिका


ऋणनिर्देश ०४

भूमिका ०६

प्रकरण पहिले १२

साहित्य आणि संस्कृती: परस्पर संबंध

प्रकरण दुसरे २७

कुंपनापलीकडले शेत: स्वरूप आणि वैशिष्ट्ये

प्रकरण तिसरे ४७

भारतीय आणि पाश्चिमात्य देश: सांस्कृतिक संबंध

प्रकरण चौथे ६२

भारतीय लेखक आणि पाश्चिमात्य संस्कृती

प्रकरण पाचवे ८५

भारतीय आणि पाश्चिमात्य संस्कृती: तुलनात्मक अभ्यास